# सौंदर्यांचे भाष्यकार : श्री. के. क्षीरसागर

सदानंद कदम

मराठी भाषा आणि मराठी संस्कृतीच्या क्षेत्रातील घडामोडींचा 'जागल्याच्या' भूमिकेतून वेध घेणारे टीकाकार श्रीकृष्ण केशव क्षीरसागर सांगलीच्या स्टेशन रस्त्यावर रहायचे. तत्त्वचिंतक आणि शैलीकार म्हणून प्रख्यात असणारे क्षीरसागर 'श्रीकेक्षी' या नावानंच ओळखले जायचे. सौंदर्यवादी साहित्यिक, विद्यार्थीप्रिय अध्यापक आणि वैचारिक लढ्याला सदैव सिद्ध असणारा हा टीकाकार हाडाचा प्रेमिक होता. सौंदर्याचा भक्त होता. श्रीकेक्षी सातारा जिल्ह्यातील खंडोबाच्या पालचे. ६ नोव्हेंबर १९०१ हा त्यांचा जन्मदिवस. पाल, सातारा, धारवाड आणि पुणे असा त्यांचा शिक्षणप्रवास. उन्हाळा, दिवाळी आणि नाताळच्या सुट्टीत थोरले बंधू रहात असलेल्या सांगलीत वास्तव्य. शेवटचं एक तप पुणे विद्यापीठात. त्यांच्या या घरातल्या वास्तव्याबद्दलच्या भावना 'सागरमंथन'च्या अर्पण पत्रिकेतच व्यक्त झालेल्या. अभिनेते अरुण नाईक, शालन नाईक, नाटककार कमतनूरकर आणि कवी गिरीश ही त्यांची इथली दोस्त मंडळी.

श्रीकेक्षीचं पहिलं प्रकाशित लेखन म्हणजे 'स्त्री शिक्षण परिषदेची वाटाघाट' हे प्रहसन. याच काळात म्हणजे १९२६ मध्ये 'वेडी सखू' ही त्यांची पहिली कथा प्रसिद्ध झाली. 'गप्प बसायला काय घ्याल?', 'प्रतिभा आणि भाषांतरे' हे त्यांचे गाजलेले लेख. 'राक्षसविवाह' ही त्यांची कादंबरी. टीकविवेक, केशवसुत आणि तांबे, सुवर्णतुला, वादसंवाद, उमर खय्यामची फिर्याद यासारखे अनेक ग्रंथ ही श्रीकेक्षींची ग्रंथसंपदा. सखोल वाचन, विद्वता, अभ्यास आणि चिंतनातून साकारलेल्या या साहित्यकृतींची श्रीकेक्षींनी लौकिक मिळवून दिला. सौंदर्यवादी साहित्यिक आणि मार्मिक भाष्यकार म्हणून साहित्यविश्वात ते ओळखले जाऊ लागले. प्रक्षोभक विचारांच्या प्रतिपादनामुळे त्यांची 'राक्षसविवाह' ही कादंबरी गाजली. तर 'सुवर्णतुला' मुळे राजकारणावरही तत्त्ववेत्याच्या भूमिकेतून लिहिणारे विचारवंत म्हणून त्यांचा लौकिक झाला. 'टीकाविवेक' हा त्यांचा ग्रंथ मराठी समीक्षेच्या वाटचालीतील मैलाचा दगड ठरला. सौंदर्यवाद आणि गूढवाद या कलाप्रेरणांचे आधुनिक मराठीच्या संदर्भात केलेले सखोल विवेचन त्यात आले आहे.

श्रीकेक्षींच्या रसग्रहणात्मक टीकेचा अविष्कार म्हणजे 'उमर खय्यामची फिर्याद'. गझल हे त्यांचं पहिलं प्रेम होतं. परंपरागत संस्कृत काव्य त्यांना तितकसं प्रिय नव्हतं. विवेकानंद ते जे. कृष्णमूर्ती आणि योगी अरविंद ते आचार्य रजनीश यांचं श्रीकेक्षींना आकर्षण होतं. अफाट वाचन आणि चिंतन करणारे श्रीकेक्षी गाजले ते स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माधवराव पटवर्धनांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीला विरोध केल्याने. 'खरी भाषाशुद्धी आणि तिचे खरे वैरी' हा त्यांचा लेख वादळाचे मूळ ठरला. सावरकरांवरही त्यांनी आक्रमक टीका केली. बिनतोड युक्तिवाद केला.

'व्यक्तिपरीक्षण' हा त्यांच्या आवडीचा विषय होता. त्यामुळे केवळ भारतातीलच नव्हे तर साऱ्या विश्वातील थोर पुरुषांच्या कार्यकर्तृत्वाच्या मूल्यमापनात ते आयुष्यभर रमले. त्यांची यशोगाथा शब्दबद्ध केली. श्रीकेक्षी साहित्य विश्वातील एक 'जागले' होते. संस्कृतीरक्षक होते. 'अश्लीलता विरोधी कृती समितीच्या' माध्यमातून त्यांनी न्यायालयात केलेले युक्तिवाद खूपच गाजले. वाङ्मयीन वातावरण निकोप आणि विशुद्ध राखण्यासाठी अखंड कार्यरत असणारा तो टीकाकार होता. 'श्रीकेक्षी' या तीन अक्षरांच्या मागील जीवनकथेबद्दल जाणकार वाचकांना खूप उत्सुकता होती. ती त्यांच्या 'तसबीर आणि तकदीर' या आत्मचरित्रामुळे शमली. एका रोमँटिक आणि ध्येयवादी जीवनाचा पट त्यामुळे उलगडला गेला. श्रीकेक्षींनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पत्रिकेचे संपादनही केले. दीर्घकाळ

वृत्तपत्रीय सदर लेखन केले. मराठीत विचारवंत सदर लेखकांची परंपरा निर्माण केली. सुसंवाद, हितगूज, प्राप्तसंवाद आणि सहजसंवाद ही त्यांची सदरे वृत्तपत्रांचे भूषण ठरली.

या सौंदर्यवादी व्यक्तिमत्वाकडे खूप सन्मान चालून आले. बडोदा ते औदुंबर आणि इंदूर–ग्वाल्हेर ते अंमळनेर अशा सर्व ठिकाणच्या साहित्य संमेलनाचे आणि १९५९ मध्ये मिरजेत संपन्न झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अखिल भारतीय स्तरावरच्या अनेक परिषदांतून त्यांचे शोधनिबंध चर्चिले गेले. अखेरच्या काळात त्यांचे वास्तव्य पुण्यात होतं. १९८० च्या २९ एप्रिलला श्रीकेक्षी गेले आणि मराठी समीक्षेचे तारांगणच गतप्रभ झाले. आपल्या भावप्रतीतीतून स्फुरणारी सर्जनशील काव्यात्म समीक्षा फुलविणारा तो सौंदर्यवादी साहित्यिक सांगलीत घालविलेल्या काळाप्रती ऋणी होता. आता जाता–येता सांगलीतलं त्यांचं घर पाहिलं की त्यांची आठवण येते आणि मनात रुंजी घालते ती त्यांची ‘देहलीदीपा’ सारखी समीक्षा !

*